मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पीएमआरडीएच्या घरांच्या किंमती वाढल्या

## दीड ते दोन लाख रुपये किंमती वाढविल्या : रेडीरेकनरच्या दरानुसार ही वाढ केल्याचे प्रशासन सांगत आहे

**पिंपरी | प्रतिनिधी**

सर्वसामान्य नागरिकांना हक्काचे घर मिळावे, यासाठी पीएमआरडीएच्या वतीने तब्बल दोन वर्षांनी शिल्लक घरांच्या सोडतीचा मुहूर्त काढला आहे. मात्र, परवडणाऱ्या घरे अशी माहिती देताना, दोन वर्षांपूर्वी काढण्यात आलेल्या दरामध्ये तब्बल दीड ते दोन लाखांनी वाढ केली आहे. सध्याच्या रेडीरेकनरच्या दरानुसार ही वाढ केल्याचे पीएमआरडीए प्रशासन सांगत आहे. नागरिकांचा प्रतिसाद न मिळाल्यास वरिष्ठांना त्या बाबत कळविण्यात येणार आहे.



पेठ क्रमांक १२ येथे चार हजार ८८३ तर, पेठ क्रमांक ३०-३२ या ठिकाणी ७९२ सदनिकांचा प्रकल्प उभारण्यात आला होता. सर्वसामान्य नागरिकांना परवडेल अशा किमतीमध्ये ही घरे उभारण्यात आली होती. मात्र, सदनिकाची किंमत, दहा टक्के म्हणजेच लाखांमध्ये भरण्यात येणारी अनामत रक्कम, किचकट प्रक्रिया आणि घरांचा दर्जा हा विचार केल्यानंतर या प्रकल्पांना म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नव्हता. परिणामी, दोन्ही प्रकल्पात एक हजार ३३७ घरे रिकामी राहिली होती. यानंतर मात्र संबंधित घरे विकण्यासाठी प्रयत्न केला नसल्याचे दिसून आले. डिसेंबर २०२२ नंतर सोडत निघाली नाही. त्यामुळे जवळपास पावणे दोन वर्ष या सदनिका धुळखात पडल्या होत्या. तांत्रिकदृष्ट्या येणारी अडचण, लोकसभा निवडणुक आणि इतर कारणांमुळे ही प्रक्रिया होऊ शकली नाही. यापूर्वी करण्यात आलेल्या सोडती पेठ ३०-३२ या सदनिकांची रक्कम ही १९ लाख ते २५ लाख या टप्प्यात होती. ती आता २० लाख ते २८ लाख यादरम्यान आकारण्यात येणार आहे. तर, सेक्टर १२ या ठिकाणी किंमत ७ लाख ते ३२ लाख होती. ती आता १५ लाख ते ३५ लाख असणार आहे.

> सध्या शासकीय नियमानुसारच दर ठरवलेले आहेत. आत्ताच या घरांना प्रतिसाद मिळणार नाही, असा अंदाज बांधणे चुकीचे आहे. शासकीय प्रक्रिया पार पाडावी लागेल. त्यामध्ये नागरिकांचा प्रतिसाद कसा आहे हे तपासले जाईल. प्रतिसाद न मिळाल्यास मुख्यमंत्री यांना येणारी कारणे सांगितले जाईल. त्यानुसार त्यांच्या पातळीवर निर्णय घेतले जातील.
> - योगेश म्हसे, आयुक्त. पीएमआरडीए..

पिंपरी चिंचवड शहरात कामगार, मोलमजुरी करणारा वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. पीएमआरडीएने घरांसाठी वाढविलेल्या किंमती सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या नाहीत. परिणामी या सोडतीकडे शहरातील नागरिक पाठ फिरवतील अशी शक्यता निर्माण झाली आहे.

## राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी पथसंचलने उत्साहात

### ठिकठिकाणी नागरिकांतर्फे उत्स्फूर्तपणे स्वागत, विविध मान्यवरांनी उपस्थिती



**पिंपरी | प्रतिनिधी**

शिस्तबध्दरित्या ओळीत चालणारे एकसारख्या संघ गणवेशातील दंडधारी स्वयंसेवक, लयबद्ध रचना सादर करीत संपूर्ण वातावरण भारावून टाकणारे घोषपथक आणि मध्यभागी डौलात फडकणारा भगवा ध्वज अन् त्यावर नागरिकांकडून होत असलेली पुष्पवृष्टी स्वागत.. निमित्त होते पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विजयादशमी पथसंचलनाचे..!

राष्ट्रहित व सेवा कार्यासाठी सदैव कटिबद्ध असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे विजयादशमी निमित्याने शहरात शनिवार दि.१२ ऑक्टोबर रोजी पिंपरी चिंचवड शहरातील तब्बल २६ ठिकाणी देहूरोड आकुर्डी, रावेत,हिंजवडी पूनावळे, वाकड थेरगाव, चिंचवड पूर्व - पश्चिम, पिंपरी, काळेवाडी, पिंपळे निलख, पिंपळे सौदागर, पिंपळे गुरव, सांगवी, कासारवाडी, आळंदी, मोशी, संभाजी नगर, चिखली,आळंदी, निगडी या भागात सकाळी तर देहू, संत तुकाराम नगर, दिघी, चऱ्होली, भोसरी, इंद्रायणी नगर भागात सायंकाळी नियोजित मार्गावर संघ गणवेशातील स्वयंसेवकांचे सदंड पथसंचलन उत्साहात संपन्न झाले आहे.

घोषाच्या तालावर हजारो स्वयंसेवकांनी संचलनात सहभाग घेऊन सामूहिकतेचे दर्शन घडविले. विविध क्षेत्रातील मान्यवर, प्रमुख अतिथी, लोकप्रतिनिधी विविध भागातील संचलनात सहभागी झाले होते. ठिकठिकाणी नागरिकांनी उस्फूर्तपणे पुष्पवृष्टी, भारत माता की जयच्या जयघोषात रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून भव्य स्वागत केले.

## लाखो लोकांच्या साक्षीने सांगवीत 'अहंकार'रुपी रावणाचे दहन

### भाजप शहराध्यक्ष शंकर जगताप आयोजित कार्यक्रमाला 1 लाखांहून अधिक नागरिकांची हजेरी : महाभोंडला कार्यक्रमात कथ्थक, रासगरबा, गोंधळी, पारंपारिक नृत्यांचे सादरीकरण

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकनेते लक्ष्मणभाऊ जगताप मित्र परिवार यांच्या वतीने विजयादशमीनिमित्त आयोजित करण्यात आलेला महिलांसाठी महाभोंडला व रावणदहन सोहळा पिंपळे गुरव, सांगवी आणि पिंपरी चिंचवड शहरातील लाखो नागरिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि जल्लोषात संपन्न झाला. सुमारे १ लाखांहून अधिक नागरिकांच्या साक्षीने अहंकाराचे प्रतीक असलेल्या रावणाच्या पुतळ्याचे दहन करण्यात आले.



सांगवी येथील पीडब्लूडी ग्राउंडवर शनिवारी (दि. १२ ऑक्टोबर) सायंकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत हा सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व छत्रपती शिवाजी महाराज, आई तुळजाभवानी माता आणि स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. तसेच उद्योगमहर्षी, पद्मविभूषण स्व. रतन टाटा यांनाही आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाच्या सुरवातीला महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या महाभोंडला कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात शालिनीताई ग्रुप, परंपरा ग्रुप, अनुभूती ग्रुपच्या महिलांनी प्रथम गोंधळी नृत्यातून मंगळागौरीचा जागर केला. तर डोनेटेड सोसायटी ग्रुप, नवदुर्गा महिला मंडळ ग्रुप, राधाकृष्ण ग्रुप, वृंदावन ग्रुपच्या महिलांनी रासगरबा नृत्याचे सादरीकरण केले. तसेच मयूर डान्स अकॅडमीच्या मानसी भागवत यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोर सादर केलेल्या 'रामयणा'वर आधारित कथ्थक नृत्य तर 'दम दमा दम' या रिॲलिटी शोचे विजेते नृत्य कलाकार यांनी तानाजी मालुसरे यांच्यावरील 'गड आला पण सिंह गेला' थीमवर आधारित नृत्य सादर केले. यावेळी महाभोंडला कार्यक्रमात सहभागी झालेल्या सर्व महिला ग्रुपला आयोजकांच्या वतीने विशेष भेटवस्तू देण्यात आले.

या कार्यक्रमासाठी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित लवकरच प्रदर्शित होत असलेल्या 'धर्मरक्षक महावीर छत्रपती संभाजी महाराज' या चित्रपटात शंभूराजांची भूमिका साकारलेले कलाकार अनुप सिंग ठाकूर, चित्रपटाचे दिग्दर्शक दादा पाटील, आणि सहकलाकार श्रद्धा शिंदे यांनी विशेष हजेरी लावली. याप्रसंगी दाखविण्यात आलेल्या चित्रपटाच्या ट्रेलरला उपस्थित नागरिकांनी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांचा जयजयकार करून भरभरून दाद दिली.

त्याचबरोबर युट्युबवरील गाजलेल्या 'चांडाळ चौकटीच्या करामती' या वेबसिरीजचे कलाकार भरत शिंदे, रामभाऊ जगताप आणि सुभाष मदने यांनी सादर केलेल्या 'ग्रामपंचायतीच्या ग्रामसभे'च्या विनोदी नाट्याने उपस्थितांचे पुरेपूर मनोरंजन केले. ( उर्वरित पान २ वर )

# आचारसंहितेआधी 400 कोटी रुपयांच्या 220 प्रस्तावांना स्थायी समितीची मान्यता

**आगामी विधानसभा निवडणूक प्रचाराचा सर्वच राजकीय पक्षांकडून धुरळा उडवला जात आहे. त्याचा परिणाम प्रशासकराज असलेल्या महापालिकेवरदेखील पहायला मिळत आहे**

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणूक प्रचाराचा सर्वच राजकीय पक्षांकडून धुरळा उडवला जात आहे. त्याचा परिणाम प्रशासकराज असलेल्या महापालिकेवरदेखील पहायला मिळत आहे. आचारसंहिता लागण्याआधी जसे राज्य शासनाने हजारो कोटींच्या प्रकल्पांना मान्यता दिली. तसाच प्रकार महापालिकेमध्ये पाहायला मिळाला. पालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत एकाच दिवसात तब्बल ४०० कोटी रुपयांच्या २२० प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे.

आचारसंहितेच्या आधी मंजूर करण्यात आलेले हे ४०० कोटींचे प्रकल्प कोणत्या राजकीय पक्षाच्या पथ्यावर पडणार, हे निवडणुकीच्या आखाड्याचा निकाल लागल्यावरच समजेल. मात्र, विरोधी पक्षांकडून प्रशासनावर गंभीर आरोप करण्यास सुरुवात झाली आहे. बड्या मंत्र्यांच्या इशाऱ्यावरून महापालिका प्रशासन ही गणिते जुळवत असल्याचा आरोप विरोधी पक्षांकडून केला जाऊ लागला आहे.

या प्रस्तावांवर चर्चा होणे अपेक्षित असताना विनाचर्चा मान्यता देण्यात आल्याची कुजबूज पालिकेत सुरू होती. स्थायी समितीने तब्बल २२० प्रस्तावांना मान्यता देत नवा विक्रम प्रस्थापित केल्याची उपरोधिक टीका विरोधकांकडून सुरू आहे.




### हे तर प्रचार पॅकेज : प्रशांत जगताप

» महापालिकेत प्रशासकराज सुरु आहे. प्रशासकाला शहरासाठी काम करण्याची मोठी संधी होती. गेल्या काही वर्षात पुणे शहराचे धिंडवडे निघाले आहेत. एवढा पाऊस होऊनही अनेक भागात पाणीटंचाई आहे. महापालिकेच्या कामाचा दर्जा बघून राष्ट्रपती कार्यालयाने नाराजी व्यक्त केली. शहराला पूर परिस्थितीला सामारे जावे लागले. एकाच दिवसात ४०० कोटींच्या कामामध्ये ज्या मतदारसंघात आमदारांवर मतदारांची नाराजी आहे, त्याभागाचा अधिक समावेश असल्याचे दिसते. त्या आमदारांना निवडून आणण्यासाठी राबवण्यात येत असलेले हे प्रचार पॅकेज आहे. आमदार आणि ठेकेदारांच्या भल्यासाठी काम सुरू आहे. हा निर्णय राजकीय फायद्यासाठी घेतल्याचे राष्ट्रवादीचे (शरद पवार) शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी सुनावले..

### 90 कोटींच्या 160 प्रस्तावांना मंजुरी

» महापालिकेच्या स्थायी समितीने उद्यान, पथ, पाणी पुरवठा यांच्यासह इतर विभाग आणि समाविष्ट गावांमधील विविध विकास कामांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली आहे. महापालिका प्रशासनाकडून गेल्या आठवड्यात झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीत ९० कोटींच्या १६० प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर सलग दुसऱ्या आठवड्यातही महापालिका प्रशासनाने स्थायी समितीची बैठक घेत अधिकाधिक प्रस्तावांना मान्यता देण्याचा झपाटा सुरूच ठेवल्याचे चित्र आहे.

### महापालिका लुटण्याचा धंदा : अरविंद शिंदे

» राज्य शासनाच्या आदेशाने महापालिकेचे आयुक्त काम करीत आहेत. त्यांची निवृत्ती जवळ आली आहे. सत्ता बदल होणार असल्याने बदलीच्या भीतीने सध्या महापालिका लूटण्याचा धंदा सुरु आहे. २२० प्रस्तावांमध्ये अनेक प्रस्तावांचे विषय पत्रदेखील तयार न करताच मान्यता घेण्यात आली आहे. मान्यतेनंतर विषय पत्र तयार करण्याचा उलटा कारभार महापालिका करणार आहे. राज्य सरकारच्या आदेशाने ५०० कोटी रुपये गोळा करण्याचे उद्दिष्ट पुणे जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना दिले आहे. त्यामुळे मनमानी कारभार सुरु आहे. कामाचा एवढा वेग ठेवला असता तर पुणेकरांना समस्यांचा सामना करावा लागला नसता. ही लूट करता यावी, म्हणून सरकार महापालिकेच्या निवडणुका घेत नाही, अशी टीका कॉंग्रेस शहराध्यक्ष अरविंद शिंदे यांनी केली.

# रतन टाटा यांच्या स्मृती चिरंतन जतन करण्यासाठी शहरवासीयांनी पुढे यावे : प्रवीण तुपे

**रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चिंचवड, सायन्स पार्क येथे आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत ते बोलत होते**

**पुणे | प्रतिनिधी**

पाच गावांचे एकत्रीकरण करून पिंपरी चिंचवड नगरपालिका स्थापन झाली. मेट्रो सिटी असा नावलौकिक आंतरराष्ट्रीय पातळीवर पोहोचला आहे. वेगाने विकसित होणारे शहर म्हणून पिंपरी चिंचवडचे नाव घेतले जाते. यामधे उद्योगपती रतन टाटा यांचे अमूल्य योगदान आहे. त्यांच्या स्मृती चिरंतन जतन करण्यासाठी शहरवासीयांनी पुढे यावे असे आवाहन पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे संस्थापक अध्यक्ष प्रवीण तुपे यांनी केले.



भारताच्या उद्योग जगताचे पितामह पद्मविभूषण रतन टाटा यांचे बुधवारी रात्री निधन झाले. पुणे, पिंपरी चिंचवड शहर व रतन टाटा यांचे भावनिक स्नेह संबंध होते. रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी चिंचवड, सायन्स पार्क येथे शुक्रवारी, (दि. ११) आयोजित केलेल्या श्रद्धांजली सभेत तुपे बोलत होते. यावेळी पिंपरी चिंचवड लघुउद्योग संघटनेचे अध्यक्ष संदीप बेलसरे, माजी नगरसेवक मारुती भापकर, इंद्रायणी इंडस्ट्रियल असोसिएशनचे संचालक बाळासाहेब शेंडगे, पिंपरी चिंचवड मनपा कर्मचारी महासंघाचे अनिल राऊत, मरकळ इंडस्ट्रियल असोसिएशनचे देशपांडे, पिंपरी चिंचवड सोशल फाउंडेशनचे पुरुषोत्तम डबीर, मोहन लोंढे, मल्लप्पा कस्तुरे, ज्येष्ठ पत्रकार पांडुरंग गवळी, उद्योजक प्रमोद राणे, सायन्स पार्कचे कार्यकारी अधिकारी नंदकुमार कासार, सहाय्यक शिक्षणाधिकारी सुनील पोटे, विज्ञान अधिकारी सोनल थोरवे, अस्मिता सावंत, पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, मरकळ इंडस्ट्रीज असोसिएशन व धानोरे येथील इंद्रायणी इंडस्ट्रियल तसेच सायन्स पार्कशी सहयोगी विविध संस्थांचे प्रतिनिधी व परिसरातील उद्योजक, कामगार उपस्थित होते.

यावेळी श्रद्धांजली अर्पण करताना तुपे म्हणाले की, रतन टाटा यांचा परिसस्पर्श विविध सामाजिक ट्रस्ट, शैक्षणिक व संशोधन संस्था, संघटनांना लाभला आहे. पिंपरी चिंचवड मनपा निर्मित सायन्स पार्कच्या निर्मितीतीत टाटा यांचे उल्लेखनीय योगदान आहे. यामध्ये विविध प्रदर्शन कक्षांच्या, विशेषतः ऑटोमोबाईल या कक्षाच्या जडणघडणीत टाटा मोटर्सचे, तसेच कल्पकघर या आयसर पुणे व सायन्स पार्कच्या संयुक्त उपक्रमास टाटा टेक्नोलॉजीज यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. रतन टाटा यांनी राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषदेच्या माध्यमातून सायन्स पार्क येथे वैशिष्ट्यपूर्ण प्रदर्शन कक्ष प्रेक्षकांसाठी उभारला आहे. येथे दरवर्षी तीन लाखाहून जास्त विद्यार्थी भेट देण्यासाठी येतात. 'सॉल्ट ते सॉफ्टवेअर' अशा सर्व क्षेत्रात टाटाचे नाव उंचावण्यासाठी रतन टाटा यांचे योगदान आहे. देश प्रेमाबरोबरच आपल्या कामगारांवरही त्यांनी कुटुंब प्रमाणे प्रेम केले. सर्व घटकांनी एकत्र येऊन पिंपरी चिंचवड या कामगार नगरीचा आणखी वेगाने विस्तार करून सर्वसामान्य नागरिकांचे जीवन अधिक सुखकर करण्यासाठी पुढाकार घ्यावा, हीच रतन टाटा यांना आदरांजली ठरेल असे तुपे म्हणाले.

संदीप बेलसरे यांनी श्रद्धांजली अर्पण करताना सांगितले की, टाटा मोटर्सने पिंपरी चिंचवड व परिसरात अनेक उद्योजक घडवले. त्यांच्यामुळेच पिंपरी चिंचवड व परिसरात लघु आणि सूक्ष्म उद्योगांना तसेच मध्यम उद्योगांना चालना मिळाली. रतन टाटा यांनी निवृत्तीनंतरही तरुण उद्योजकांना स्टार्ट अप साठी पाठबळ दिले. सीएसआर फंडातून देखील त्यांनी मावळ, मुळशी सह अनेक दुर्गम भागात प्राथमिक सेवा, सुविधा देण्यात हातभार लावला.

बाळासाहेब शेंडगे यांनी सांगितले की, टाटा मोटर्स पिंपरी आणि चिंचवड मध्ये असले तरी शहराच्या बाहेर असणाऱ्या चाकण, धानोरी, मरकळ, जेजुरी, रांजणगाव या औद्योगिक पट्ट्यात देखील टाटा मोटर्स मुळे रोजगार निर्मितीस चालना मिळाली. मारुती भापकर, नंदकुमार कासार, पांडुरंग गवळी यांनी देखील रतन टाटा यांना श्रद्धांजली अर्पण केली.

# लाखो लोकांच्या साक्षीने सांगवीत 'अहंकार'रुपी रावणाचे दहन

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

मनोगत व्यक्त करताना शंकर जगताप म्हणाले की, आज या कार्यक्रमासाठी जमलेली गर्दी ही पिंपळे गुरव, सांगवी आणि पिंपरी चिंचवडकरांचे आमच्या जगताप कुटुंबावर तसेच सर्व कार्यकर्त्यांवर असलेल्या प्रेमाची खरी पोचपावती आहे. जे प्रेम आजपर्यंत तुम्ही स्व. लक्ष्मणभाऊंवर केले तेच प्रेम यापुढील काळात आम्हा सर्वांवर निरंतर राहू द्या. तुमच्या विश्वासाला कधीही तडा जाणार नाही, याची मी आपणास ग्वाही देतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे श्री. हेमंत हरहरे यांनी यावेळी सांगितले की, येणारी विधानसभा निवडणूक ही अधर्मी विरुद्ध निधर्मी अशी आहे. ही हिंदुत्वाची निवडणूक आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील २८८ जागांवर हिंदुत्ववादी विचारसारणीच्याच उमेदवारांना निवडून आणत राज्यात हिंदुत्ववादी विचारांचे सरकार आपल्याला आणायचे आहे, असे आवाहनही त्यांनी उपस्थित जनसमुदायाला केले.

दरम्यान, शंकर जगताप यांच्या हस्ते रिमोटच्या माध्यमातून ७० फुटी रावणाचे दहन करण्यात आले. यावेळी नागरिकांनी 'जय श्रीराम'च्या घोषणा दिल्या. या कार्यक्रमाला विधानपरिषद आमदार उमा खापरे, अमित गोरखे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, उपमहापौर सचिन चिंचवडे, भाजपा निमंत्रित सदस्य भारती विनोदे, संतोष कलाटे, मा.स्थायी समिती अध्यक्ष राजेंद्र राजापुरे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, उद्योजक विजुशेठ जगताप, पुणे जिल्हा नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, आरपीआय नेत्या चंद्रकांता सोनकांबळे, मा.नगरसेवक विनायक गायकवाड, बाबासाहेब त्रिभुवन, शशिकांत कदम, संतोष कांबळे, हर्षल ढोरे, अंबरनाथ कांबळे, सागर आंघोळकर, आरती चोंधे,निर्मला कुटे,नीता पाडाळे, सविता खुळे, सुष्मा तनपुरे,उषा मुंढे, शारदा सोनावणे, वैशालीजवळकर, मा.स्वीकृत सदस्य विठ्ठल भोईर, विनोद तापकीर, महेश जगताप, गोपाळ माळेकर, संजय कणसे,सखाराम नखाते, मंडल अध्यक्ष प्रसाद कस्पटे,सोमनाथ भोंडवे, .प्रकाश मीठभाकरे, जयनाथ काटे, नरेश खुळे,. संजय भिसे, गणेश कस्पटे, शेखर चिंचवडे, नितीन इंगवले, राजाभाऊ चिंचवडे, हरिभाऊ चिंचवडे, बाबाजी तरस, राजू साळवे, विलास पाडाळे, विलास तात्या जगताप, दीपक भोंडवे, तानाजी भोंडवे, निलेश भोंडवे, दिलीप तनपुरे, गणेश नखाते, रणजीत कलाटे, नरेंद्र माने,.सोमनाथ तापकीर, संतोष ढोरे, संकेत कुटे, कुणाल वाव्हळकर, गिरीश जाचक, देविदास तांबे, सचिन शिवले, सखाराम रेडेकर, गणेश ढोरे, .गणेश बनकर,.रमेश काशीद, नरेश जगताप, दीपक काशीद, .संजय मराठे,.अजय दुधभाते, भाजपा चिटणीस सागर फुगे, सिकंदर सूर्यवंशी,उमेश बोरसे, सामाजिक कार्यकर्त्या कुंदा भिसे,कावेरी जगताप,.उज्वला गावडे, पल्लवी जगताप, मंदाकिनी तनपुरे,शोभा जांभूळकर, सारिका भंडलकर, पंचशीला दुधारे, स्वरूपा खापेकर, दुर्गा आदियाल, कोमल गौंडाडकर यांच्यासह सर्व भाजपा नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्यार्थी वाहतुकीच्या प्रश्नावर ठोस उपाययोजना निघेना

## स्कूलबस अपघातांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

गेल्या काही महिन्यांमध्ये स्कूलबस अपघातांमुळे पिंपरी-चिंचवड शहरातील विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. याबाबत आरटीओ विभागाने पुढाकार घेऊन शाळा प्रशासनाशी संवाद साधला होता. मेल पाठवून शालेय परिवहन समिती तसेच, नियमांची पालन करण्याबाबत कळवले देखील होते. मात्र अद्याप परिवहन समिती कागदावरच असल्याचे दिसून येते. आत्तापर्यंत केवळ ५८ शाळांमध्येच ही बैठक झाली असल्याचे दिसून येते. दुसरीकडे आरटीओ विभागाने संबंधित बैठकीवर कार्यवाही करण्याचे अधिकार शिक्षण विभागाला असल्याचे सांगितले आहे. तर, राज्य शासनाचे जे काय आदेश आहेत ते शाळा प्रशासनाकडे पोहोचवणे हे आपले काम असल्याचे महापालिका शिक्षण विभागाने स्पष्ट केले.

शहरातील खासगी शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहेत. त्याचप्रमाणे विविध उपनगरामध्ये प्री स्कूलही मोठ्या प्रमाणात सुरु आहेत. त्यामुळे स्कूलबसमधून प्रवास करणारे विद्यार्थी सुरक्षित आहेत का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. एखादी दुर्घटना घडल्यानंतर प्रत्येकवेळी जुजबी कारवाई केली जाते. नंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे' होते, याबाबत ना आरटीओ विभाग पुढाकार घेताना दिसत आहे ना महापालिका स्तरावरती शिक्षण विभाग. परिणामी, अशा घटनांना वेळीच आळा घालण्याबाबत कार्यवाही होत नसल्याचे दिसून येते. पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागात २,९५१ स्कूल बसची नोंद आहे. शालेय मुलांची वाहतूक करणाऱ्या वाहनामधून क्षमतेपेक्षा जादा वाहतूक सुरू आहे. अनेक चालकांकडे वैध योग्यता प्रमाणपत्र नाही. दुसरीकडे, प्रत्येक शालेय वाहनेने नियमाचे पालन करणे आवश्यक आहे.

मात्र आजही खाजगी वाहनातून अथवा रिक्षातून देखील सर्रासपणे विद्यार्थी वाहतूक होत असते. अनेकदा संबंधित वाहनचालक उपलब्ध नसल्यास दुसरीच वाहन पाठवले, असे अनेकदा घडत असते. त्या वाहन चालकाला याबाबत माहिती नसल्याने अपघातासारख्या घटना होतात. चालकांना वाहनांमध्ये परिचालक, अग्निशमन यंत्रणा, वाहनांना पिवळा रंग, आपत्कालीन दरवाजा, खिडकीच्या बाहेरील बाजूस आडवे लोखंडी बार यासह विविध नियम आहेत. पण, स्कूल व्हॅन, रिक्षाचालक या कोणत्याच नियमांचे पालन करत नाहीत.




### उल्लंघन करणाऱ्या शाळांवर कारवाई कधी?

» आरटीओकडून संबंधित शाळेत प्रशासनाकडे या समितीच्या बैठकीकडे कळवले जाते. यानंतर बैठकीचे संबंधितचे पत्र आरटीओ विभाग आणि पोलिसांना देणे गरजेचे असते. त्याबाबतची कारवाई आणि अधिकार हे शिक्षण विभागाला आहे. अशाप्रकारे उल्लंघन करणाऱ्या शाळेवर कारवाई करण्याबाबत कोणीही पुढाकार घेत नसल्याने समितीची बैठक केवळ कागदावर राहिली आहे.

### शिक्षण विभागाला अधिकार

» शाळांवर परिवहन समिती स्थापन करा, अशी सूचना आम्ही करू शकतो. पण, कार्यवाही करायचा अधिकार शिक्षण विभागाला आहे. वाहनांमध्ये काही त्रुटी असतील, तर वाहनचालकांना दंड करण्याचा अधिकार आम्हाला आहे. त्याबाबत आमची नियमित तपासणी सुरू असते. त्याचप्रमाणे स्कूल बसचालकांनी आणखीन काही फिटनेस प्रमाणपत्र पूर्ण केले नाहीत. याबाबत त्यांना यापूर्वीच कळवले असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी राहुल जाधव यांनी सांगितले.

> महापालिका शाळांना बस सेवा नाहीत. खाजगी शाळांना त्या सेवा आहेत. त्यामुळे परिवहन आणि बस बाबतवर लक्ष ठेवण्यास आरटीओ आहे. राज्य शासनाने याबाबतच्या काही मार्गदर्शक तत्वे दिलेले आहेत ते सर्व शाळांपर्यंत आम्ही पोचवत आहोत.
>
> **- विजय थोरात, सहाय्यक आयुक्त,शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

# सायबर पोलिस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल

## स्वतंत्र सायबर पोलिस ठाण्याच्या प्रत्यक्ष कामकाजास सुरवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड पोलिस आयुक्तालयात स्वतंत्र सायबर पोलिस ठाण्याला मंजुरी मिळाल्यानंतर आता स्वतंत्र सायबर पोलिस ठाण्याच्या प्रत्यक्ष कामकाजाला सुरवात झाली आहे. शनिवारी (ता. १२) रात्री आठ वाजून १९ मिनिटांनी सायबर पोलिस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल झाला आहे. या ठाण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांचीही नेमणूक करण्यात आली आहे.

सायबर चोरटे ऑनलाइन माध्यमातून कोट्यवधी रुपयांच्या रकमेवर डल्ला मारत आहेत. आयुक्तालयातील सायबर सेलकडे दर दिवशी सरासरी साठ ते ७० तक्रारी प्राप्त होतात. त्यामुळे सायबर विभाग अधिक सक्षम करणे आवश्यक बनले होते. त्यासाठी स्वतंत्र सायबर पोलिस ठाण्याच्या निर्मितीसह मनुष्यबळाचीही आवश्यकता होती. दरम्यान, काही दिवसांपूर्वीच नवीन स्वतंत्र सायबर पोलिस ठाण्याला मंजुरी मिळाली. त्यानंतर एक पोलिस निरीक्षक, दोन सहायक निरीक्षक, तीन उपनिरीक्षक व ४५ अंमलदार यांची नेमणूकही करण्यात आली. मात्र, प्रत्यक्ष स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यास सुरवात झाली नव्हती. दरम्यान, आता शनिवारपासून स्वतंत्र सायबर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यास सुरवात झाली आहे.

सांगवी येथील एका व्यक्तीच्या झालेल्या फसवणुकीबाबतचा हा गुन्हा आहे. याप्रकरणी ५९ वर्षीय व्यक्तीने फिर्याद दिली आहे. त्यानुसार वेगवेगळ्या बँकेच्या खातेधारकांवर गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादीला एका कंपनीच्या शेअर ट्रेडिंग ग्रुपवर ॲड करून घेतले. आरोपींनी त्यांच्या कंपनीच्या ट्रेडिंग प्लॅटफॉर्मद्वारे पैसे गुंतवणूक केल्यास २५ ते ३० टक्के नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवले. त्यानंतर शेअर ट्रेडिंगला वेगवेगळ्या बँकेच्या खात्यावर ६० लाख ३० हजार रुपये भरण्यास भाग पाडून फिर्यादी यांची फसवणूक केली.



### तक्रारदारांना मिळणार दिलासा

» या अगोदर सायबर सेल तक्रारी अर्ज स्वीकारून त्यावर कार्यवाही केली जात होती. अर्जाची शहानिशा करून, संबंधित पोलिस ठाण्याकडे गुन्हा दाखल करण्यासाठी पाठवले जात होते. पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास सुरु केला जात होता. यामध्ये खूप वेळ निघून जात होता. मात्र, आता सायबर पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्यांना गुन्हा दाखल करून तपास करण्याचे अधिकार प्राप्त झाले आहेत. यामुळे तक्रारदारांना दिलासा मिळणार आहे.

> "शासनाने सायबर पोलिस ठाण्याला मंजुरी दिल्यानंतर आयुक्तालयात स्वतंत्र सायबर पोलिस ठाणे कार्यान्वित झाले आहे. या ठाण्यासाठी अधिकारी, कर्मचाऱ्यांचीही नेमणूक केली आहे. शनिवारी पहिला गुन्हा दाखल झाला आहे. आता तत्काळ गुन्हा दाखल करून, सखोल तपास करणे शक्य होणार आहे. यामुळे तक्रारदारांना अधिक चांगली सेवा मिळेल.
>
> **- संदीप डोईफोडे, पोलिस उपायुक्त, गुन्हे शाखा.**

# उद्योगनगरीतील 522 मुलांनी चढली नाही शाळेची पायरी

## महापालिकेने स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने केलेल्या सर्वेक्षणात धक्कादायक माहिती समोर

**पिंपरी | प्रतिनिधी**

शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्यासाठी महापालिकेने स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने केलेल्या सर्वेक्षणात आतापर्यंत ५२२ मुले शाळाबाह्य असल्याचे समोर आले आहे. उद्योग, कामगारनगरी अशी ओळख असलेल्या पिंपरी- चिंचवडमध्ये ५२२ मुलांनी शाळेची पायरी चढली नसल्याचे समोर आले आहे.

महापालिकेच्या शिक्षण विभागाने यावर्षी जुलैच्या सुरुवातीला शाळाबाह्य मुलांची ओळख पटवण्यासाठी स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने सर्वंकष सर्वेक्षण सुरू केले. शिक्षण विभागाने शाळाबाह्य मुलांची तत्काळ नोंदणी समाविष्ट करण्यासाठी मुख्याध्यापकांना शक्य तितक्या मुलांची, विशेषत: असुरक्षित भागातील मुलांची नोंदणी करण्याचे निर्देश दिले आहेत. उर्वरित सर्व मुलांची नोंदणी २० ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे शिक्षण विभागाने उद्दिष्ट ठेवले आहे.

दुसऱ्या टप्प्यामध्ये जन्म प्रमाणपत्रांच्या माहितीचे (डेटा) संकलन केले जाणार आहे. शिक्षण विभाग मुलांसाठी जन्म प्रमाणपत्र मिळण्याची प्रक्रिया सोपी करण्यासाठी स्थानिक रुग्णालयांना मदत करणार आहे.



यामध्ये वॉर्डनिहाय वेळापत्रक तयार केले जाणार आहे. शाळा व्यवस्थापन समित्यांसह शाळेचे मुख्याध्यापक या प्रक्रियेसाठी अचूक माहिती संकलित करण्याच्या व त्याची पडताळणी करण्याच्या प्रक्रियेमध्ये महत्त्वाची भूमिका बजाविणार आहेत. तर, तिसऱ्या टप्प्यामध्ये जन्म प्रमाणपत्रे दिल्यानंतर ज्या मुलांकडे आधार कार्ड नाही, त्यांचे आधार कार्ड तयार करून दिले जाणार आहे. त्यासाठी आधार प्राधिकरणाशी समन्वय साधला जाणार असून, त्यानुसार शाळांना सूचना देण्यात येणार आहेत.

मुलांना शाळेमध्ये जाण्यापासून रोखणारे अडथळे दूर करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. शाळाबाह्य मुलांची नावनोंदणी प्रक्रिया कार्यक्षम करण्यासाठी मुख्याध्यापक आणि स्वयंसेवकांसोबत बारकाईने काम केले जात आहे. कोणतेही मुल शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत, असे शिक्षण विभागाचे सहायक आयुक्त विजयकुमार थोरात यांनी सांगितले.

### मुलांची कायमस्वरूपी नोंद

» महापालिका इतर राज्यांमध्ये स्थलांतरित होणाऱ्या मुलांसाठी 'शिक्षण हमी कार्ड' देण्याची योजना आखत आहे. त्यामुळे देशभरातील सरकारी शाळांमध्ये स्थलांतरित विद्यार्थ्यांची 'शिक्षण हमी कार्डद्वारे' कायमस्वरुपी नोंद होणार आहे.

# 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' स्पर्धेत न्यू इंग्लिश स्कूलचा प्रथम क्रमांक

## न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड या शाळेने विभागीय पातळीवर महापालिका खासगी शाळा गटात प्रथम क्रमांक पटकावून एकवीस लाखांचे पारितोषिक मिळवले आहे

**पुणे | प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाने राबवलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या अभियानामध्ये 'न्यू इंग्लिश स्कूल, टिळक रोड, पुणे' या शाळेने विभागीय पातळीवर अ व ब वर्ग महापालिका खासगी शाळा गटात प्रथम क्रमांक पटकावून एकवीस लाखांचे पारितोषिक मिळवले आहे. नागपूरच्या सरस्वती विद्यालयाला दुसरा तर पुण्याच्या श्री शिवाजी मराठा हायस्कूल शाळेला तिसरा क्रमांक मिळाला.

शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता राव, पर्यवेक्षक सुरेश वरगंटीवार, शाला समिती अध्यक्ष खेमराज रणपिसे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षकांनी एकत्र येऊन या स्पर्धेसाठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले. या प्रयत्नांना या पुरस्काराच्या रूपाने यश आले.



### विशेष बाबींचे औचित्य साधून शाळा दरवर्षी एक विशेष उपक्रम

» विशेष बाबींचे औचित्य साधून शाळा दरवर्षी एक विशेष उपक्रम घेते. शाळेचे आद्यसंस्थापक विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या शतकोत्तर अमृतमहोत्सवी वर्षाचेनिमित्त साधून यावर्षी शाळेने संस्थापक सप्ताह आयोजित केला होता. यामध्ये इंडिया बुक ऑफ रेकॉर्डला नोंद झालेल्या लोकमान्य टिळकांच्या प्रतिमांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या काळात महाराष्ट्र राज्य उच्च तंत्र व शिक्षण तथा वस्त्रोद्योग मंत्री मा. चंद्रकांतदादा पाटील, लोकमान्य टिळकांच्या वंशज मा. डॉ. गीताली टिळक, माजी बालसाहित्य संमेलन अध्यक्ष डॉ. न. म. जोशी, साहित्यिका डॉ. संगीता बर्वे, व्याख्याते मोहन शेटे अशा अनेक मान्यवरांनी शाळेस भेट दिली आहे. विद्यार्थ्यांनी संस्थापकांच्या जीवनातून कोणता आदर्श घ्यावा, याबाबत हस्तलिखिते तयार केली आहेत.

कृत्रिम तारांगण असलेली आशिया खंडातील एकमेव शाळा, अवकाश निरीक्षणासाठी वेधशाळेची सोय, ३७००० पुस्तकांचे भव्य ग्रंथालय, इंग्रजी भाषा प्रयोगशाळा, गणित खेळघर, भव्य प्रयोगशाळा, भव्य मैदान, जगभरातील १२५ खनिजांचे भूवस्तूसंग्रहालय, दुर्मीळ दिव्यांचे संग्रहालय अशी या शाळेची वैशिष्ट्ये आहेत. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांच्या जयंतीच्या शतकोत्तर अमृत महोत्सवी वर्षात या पारितोषिकाच्या रूपाने पुन्हा एकदा शाळेचे नाणे खणखणीत वाजले आहे.

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत योगदान दिलेल्या या शाळेने इतिहास घडविला आहे. अगदी सामान्य घरांमधून आलेल्या विद्यार्थ्यांना अत्यंत प्रामाणिकपणे आणि मनापासून शिक्षण देऊन, त्यांचा सर्वांगीण विकास करून, समाजामध्ये, विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवून समाजाची सेवा करण्यासाठी चांगले नागरिक घडविणाऱ्या या शाळेच्या आजपर्यंतच्या प्रयत्नांना महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली ही शाबासकीची थाप आहे.

ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शाळेतील माजी विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या उल्लेखाशिवाय भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा, मराठी साहित्याचा आणि मराठी व्याकरणाचा इतिहास पूर्णच होऊ शकत नाही. अशा या शाळेमधील विविध उपक्रमांच्या माध्यमातून ऐतिहासिक वारसा विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्याचे कार्य शाळेमधून व्याख्याने, क्षेत्रभेटी यांचे आयोजन करून सतत केले जाते.

शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षकांच्या मदतीने दुधीभोपळा, दोडकी, वांगी, मिरच्या, कांदा व अळू यांचे उत्पादन परसबागेत घेतलेले आहे. शाळा सदर भाज्या जशा उपलब्ध होतील तशा पोषण आहारासाठी उपयोगात आणते.

पर्यावरण संवर्धनासाठी शाळेतील विद्यार्थी स्वयंसेवक पर्यावरणपूरक कार्यक्रम राबवतात. विद्यार्थी दर शनिवारी सभा घेऊन पुढील आठवड्यात करायच्या कामाची रूपरेषा ठरवतात. विद्यार्थी स्वतःच्या परिसरातील प्लास्टिक कचरा जमा करून इको ब्रिक्स तयार करतात. या ब्रिक्स सामाजिक संस्थांना देतात.

### अध्ययन स्तर उत्तम राखण्यासाठी विशेष प्रयत्न

» विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर उत्तम राखण्यासाठी शाळा विशेष प्रयत्न करते आहे. शाळेमध्ये नेव्ही व एअरफोर्स असे दोन एनसीसी विभाग कार्यरत आहेत. त्यांमध्ये विद्यार्थी व विद्यार्थिनी सहभागी होतात. तसेच शाळेमध्ये स्काऊट-गाईडचे गट आहेत. विविध निवासी प्रशिक्षणासाठी या सर्व गटांतील विद्यार्थी जातात इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती, आठवी शिष्यवृत्ती, मंथन, NMMS, इतिहास प्रज्ञाशोध परीक्षा, भूगोल प्रज्ञाशोध परीक्षा, संस्थेतर्फे आयोजित करण्यात येत असलेली इयत्ता सातवीची प्री-स्कॉलरशिप परीक्षा अशा विविध स्पर्धापरीक्षांमध्ये विद्यार्थी सहभाग घेऊन यश मिळवत आहेत. या परीक्षांच्या निकालाचा आलेख वाढता दिसून येत आहे.

# मतदार जनजागृतीसाठी शिरूर मध्ये विविध उपक्रम

## यामध्ये मतदान जनजागृती रॅली, कार्यशाळा, पथनाट्य आणि विद्यार्थ्यांच्या निबंध व चित्रकला स्पर्धांचा समावेश आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिरूर शहर आणि तालुक्यातील मतदारांमध्ये मतदार जनजागृती करण्यासाठी तालुका प्रशासनाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन केले. यामध्ये मतदान जनजागृती रॅली, कार्यशाळा, पथनाट्य आणि विद्यार्थ्यांच्या निबंध व चित्रकला स्पर्धांचा समावेश आहे.




शिरूर विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार बाळासाहेब म्हस्के, स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्याधिकारी प्रितम पाटील, निवडणूक नायब तहसीलदार सुजाता बाराहाते, शिरूर नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी राहुल पिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयांचे प्राचार्य, शाळांचे मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, बी. एल. ओ. आदींनी मतदार जनजागृती मोहिमेत सहभाग घेतला.

सी. टी. बोरा कॉलेज, विजय माला जुनियर कॉलेज ऑफ सायन्स, सिताबाई थिटे महाविद्यालय, न्यू इंग्लिश स्कूल व विद्याधाम प्रशाला या ठिकाणी मतदान जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. संपूर्ण मतदार संघातील विविध ठिकाणी EVM मशीन व VV PAD या बाबत प्रात्यक्षीक करून जनजागृती करण्यात आली.

मतदार जनजागृती कार्यक्रमामध्ये सर्व नागरिकांनी सहभागी होऊन लोकशाही बळकट करण्यासाठी व मतदानाची टक्केवारी वाढवावी, तसेच ज्या नागरिकांचे नाव मतदार यादीत नसेल किंवा दुरुस्ती करावयाची असेल त्यांनी आपले भागातील बी. एल. ओ. यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन 198- शिरूर विधानसभा मतदार संघाचे स्वीप नोडल अधिकारी तथा मुख्याधिकारी प्रितम पाटील यांनी केले.

### मतदार नोंदणी शिबिराचे आयोजन

» शिरूर शहरातील रयत शिक्षण संस्थेच्या मैदानावर महिलांसाठी विशेष मतदार जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले. तसेच 198 मतदार संघातील विविध ठिकाणी महिलां मतदार नोंदणी करिता, दिव्यांग मतदार नोंदणी करिता व नव मतदार नोंदणी करिता, अनुसूचित जमाती करिता नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.